## नि.क्र.८७ वर आदेश
## (दि.२४.०९.२०१९)

तृतीय पक्षकार क्रं.१ ते ३ यांनी सदरचा अर्ज त्यांना सदरच्या दाव्यात प्रतिवादी क्रं.७ ते ९ म्हणुन समाविष्ट करून घेण्याबाबत सादर केला आहे. तृतीय पक्षकारांतर्फे ॲड.श्री.डी.एल.घोगरे यांनी असा युक्तिवाद केला की, तृतीय पक्षकार क्रं.१ व २ यांचे वडील तर तृतीय पक्षकार क्रं.३ यांचे पती नामे बालाजी उर्फ बालासाहेब अंतराम देपे हे या दाव्यामध्ये प्रतिवादी क्रं.६ म्हणुन समाविष्ट आहेत. बालाजी उर्फ बालासाहेब अंतराम देपे हे मनोरूग्ण असून ते जुगार, मटका व दारूच्या व्यसनाचे आधिन गेलेले आहेत. तसेच, ते मनोरूग्ण असुन त्यांच्यावर ईलाज चालू आहे व या सर्व बाबींचा फायदा घेवून वादींनी त्यास त्यांच्या आधिन करून घेवून त्यांच्याकडे अहमदपूर येथे ठेवून घेतले आहे. सदर प्रतिवादी क्रं.६ व तृतीय पक्षकार हे गेल्या ब-याच वर्षापासुन एकत्र नाहीत. पुढे त्यांनी असा युक्तिवाद केला की, वादींनी हा दावा दाखल केला आहे त्याची माहिती तृतीय पक्षकारांना गेल्या १५ दिवसांपूर्वी गावातील काही लोकांच्या चर्चेवरून झाली त्यामुळे त्यांना समजले की, वादींनी प्रतिवादी क्रं.६ यास त्यांच्या ताब्यामध्ये ठेवून त्यांचे बयाण व जबाब दावा हा त्यांच्या सारखा लिहुन घेतला आहे. प्रतिवादी क्रं.६ हा मनोरूग्ण व व्यसनाधीन व्यक्ती असुन त्यास त्याचे हित कळत नाही व तो त्याचे व त्यांच्या कुटूंबाचे हित जोपासू शकत नाही. पुढे त्यांनी असा युक्तिवाद केला की, दावा जमीनीमध्ये या तृतीय पक्षकारांचा हक्क व हितसंबंध गुंतलेला आहे. तसेच, प्रतिवादी क्रं.६ हा तृतीय पक्षकारांच्या कुटूंबाचे हित जोपासण्या लायक व्यक्ती नाही म्हणुन या दाव्यामध्ये सदर तृतीय पक्षकार हे पक्षकार म्हणुन आवश्यक आहेत. म्हणुन या दाव्यामध्ये भवांजय बालाजी देपे, कु.भैरवी बालाजी देपे व भागूबाई उर्फ भागीरथी बालाजी देपे सर्व रा.कोपरा ता.अहमदपूर जि.लातूर त्यांची बाजु ऐकुन घेणे आवश्यक आहे. पुढे त्यांनी अशी विनंती केली की, न्यायाचे दृष्टीकोणातुन या तृतीय पक्षकारांना या दाव्यामध्ये प्रतिवादी क्रं.७ ते ९ म्हणुन समाविष्ट करून घ्यावे.

२) वादी तर्फे ॲड.श्री.व्ही.एस.शेळके यांनी असा युक्तिवाद केला की, प्रतिवादी

कं.६ हा मनोरूग्ण नाही किंवा त्याला जुगार, मटका व दारूचे त्यास व्यसन नाही. त्यामुळे प्रतिवादी कं.६ यास वादींनी आपलेसे करण्याचा प्रश्नच येत नाही. वादी हे मौजे कोपरा, ता. अहमदपूर येथे राहतात व प्रतिवादी कं.६ हा उच्च शिक्षीत असल्यामुळे अहमदपूर येथे विज्ञान विषयाचे मुलांचे कोचींग क्लासेस घेवून मुलांना विद्या देतात. प्रतिवादी क्र.६ कडे कमीत कमी ६०० विद्यार्थी दररोज शिक्षण घेतात, याकरीता प्रतिवादी क्र.६ यांनी अहमदपूर येथील हनुमान टेकडी येथे मोठी इमारत मोठया रक्कमेस खरेदी केलेली आहे. प्रतिवादी कं.६ कडे अहमदपूर शहरातील विज्ञान शाखेच्या मुलां-मुलींची आवड निर्माण झाली आहे. प्रतिवादी कं.६ हा बुध्दीवंत आहे. त्यामुळे त्यांना मनोरूग्ण व व्यसनी म्हणने व्यर्थ आहे. पुढे त्यांनी असा युक्तिवाद केला की, तृतीय पक्षकार व प्रतिवादी क्र.६ हे विभक्त नाहीत व प्रतिवादी कं.६ हे वादींकडे राहण्याचा प्रसंग किंवा कारण नाही. पुढे त्यांनी असा युक्तिवाद केला की, तृतीय पक्षकारास सन २००८ पासुन ते आजपर्यंत सर्व वस्तुस्थितीची जाण व ज्ञान आहे. परंतु, तृतीय पक्षकारास प्रतिवादी कं.१ ते ५ यांनी दगाबाजीने तृतीय पक्षकाराचा जबाब दावा त्यांचेसारखा व वादींच्या दाव्याच्या विरूध्द देण्याकरीता सदरचा निरर्थक अर्ज देण्यास भाग पाडले आहे. तृतीय पक्षकाराचा अर्ज उचित, प्रामाणिक व रास्त नसुन खोटा आहे. वादीच्या हक्कात योग्य न्यायदान होउ नये तसेच, न्यायाच्या उद्देशाची पुर्तता होवु नये म्हणुन प्रतिवादी कं.१ ते ५ यांनी तृतीय पक्षकारास आपलेसे करून व्यत्यय व्हावा या हेतुने सदरचा अर्ज दिला आहे.

३) पुढे त्यांनी असा युक्तिवाद केला की, प्रतिवादी कं.६ हा जुगारी आहे, मटका खेळतो, दारू पितो व मनोरूग्ण आहे याबाबतचा तृतीय पक्षकारांनी वैद्यकीय अधिका-यांचा सक्षम पुरावा देणे आवश्यक आहे. तसेच, पोलीसांमार्फत प्रतिवादी कं.६ विरूध्द दाखल केलेच्या खटल्यांचा पुरावा देणे अनिवार्य आहे. त्यानंतरच तृतीय पक्षकारांच्या अर्जास मान्यता मिळते. प्रतिवादी कं.६ सोबत प्रस्तुतचा दावा प्रलंबीत असताना त्याच प्रतिवादी कं.६ च्या ठिकाणी विसंगत प्रस्ताव मागणे बेकायदेशीर ठरते. पुढे त्यांनी असा युक्तिवाद केला की, आदेश १ नियम १० दिवाणी प्रक्रिया संहिता अन्वये तृतीय पक्षकार हे अयोग्य पक्षकार असुन त्यांना प्रतिवादी कं.६ च्या हयातीत समाविष्ट करणे गैर आहे. म्हणुन तृतीय पक्षकार हे आवश्यक

पक्षकार किंवा खरे पक्षकार नसुन या दाव्याच्या निर्णयामुळे त्यांचे हक्कावर बाधा पोहचत नाही आणि प्रतिवादी क्र.६ चे लेखी कथनाला तृतीय पक्षकार हे आव्हान देवु शकत नाहीत.

४) पुढे त्यांनी असा युक्तिवाद केला की, न्यायालयाने नि.क्र.६३ च्या अर्जान्वये अतिरिक्त मुद्दे नि.क्रं.६२ वर निश्चित केलेले आहेत. त्यामुळे प्रतिवादी क्रं.१ ते ५ यांनी सदरचा खोटा अर्ज तृतीय पक्षकारांच्या मार्फत सादर केला आहे. प्रतिवादी क्रं.६ हे तृतीय पक्षकारांचे कुटूंब प्रमुख असुन ते हयातीत आहेत. म्हणुन तृतीय पक्षकारास या दाव्यात पक्षकार म्हणुन समाविष्ट करणे आवश्यक नाही. तसेच, तृतीय पक्षकारांनी त्यांच्या हित संबंधाबाबत प्रतिवादी क्रं.६ च्या विरूध्द स्वतंत्र दावा देवुन स्वतंत्र मागणी करणे अनिवार्य आहे. प्रतिवादी क्रं.६ च्या लेखी जबाबाला तृतीय पक्षकारांना आव्हान देण्याचा या दाव्यात हक्क व संबंध नाही. पुढे त्यांनी अशी विनंती केली की, सदरचा अर्ज नामंजुर करण्यात यावा.

५) तृतीय पक्षकारांनी सदरच्या दाव्यात ते आवश्यक पक्षकार असल्यामुळे त्यांना प्रतिवादी क्रं.७ ते ९ म्हणुन जोडण्यात यावे याकरीता सदरचा अर्ज दिला आहे. तसेच, त्यांनी अर्जात असे कथन केले आहे की, वादींनी प्रतिवादी क्रं.६ च्या मनोरूग्ण आजाराचा व जुगार, मटका तसेच, दारूच्या व्यसनांचा फायदा घेउन त्याच्याकडुन त्यांच्यासारखा लेखी जबाब सादर करून घेतला आहे व त्याला त्यांच्या ताब्यात अहमदपूर येथे ठेवुन घेतले आहे. प्रतिवादी क्रं.६ हा मनोरूग्ण व व्यसनाधीन व्यक्ती असुन त्यास त्याचे हित कळत नाही व तो त्याचे व त्याच्या कुटूंबाचे हित जोपासू शकत नाही ही बाब कथन केलेली आहे. तसेच, दाव्यातील वाद जमीनीमध्ये या तृतीय पक्षकारांचा हक्क व हितसंबंध गुंतलेला आहे. म्हणुन या दाव्यामध्ये सदर तृतीय पक्षकारांना प्रतिवादी क्रं.७ ते ९ म्हणुन समाविष्ट करणे आवश्यक आहे असे सुध्दा कथन केलेले आहे. वादींनी तृतीय पक्षकारांनी केलेले कथन हे अमान्य केलेले आहेत. तसेच, तृतीय पक्षकारांनी प्रतिवादी क्रं.६ हा मनोरूग्न असल्याबाबत व त्याला इतर व्यसन असल्याबाबतचा कोणताही पुरावा सादर केलेला नाही असे कथन केले आहे. तसेच, प्रतिवादी क्रं.६ यांच्या विरूध्द तृतीय पक्षकारांना दाद मागण्याकरीता वेगळा दावा दाखल करण्याची

तरतुद आहे. त्यामुळे ते या प्रकरणातील आवश्यक पक्षकार नाहीत ही बाब सुध्दा त्यांनी त्यांच्या उत्तरात नमुद केली आहे. सदरच्या प्रकरणातील प्रतिवादी क्रं.६ हा हजर झाला असुन त्याने त्याचा लेखी जबाब सादर केला आहे परंतु, त्याने सदरच्या अर्जावर त्याचे कोणतेही म्हणणे सादर केले नाही.

६) वादींनी सदरचा दावा हा घोषणा व कायमचे मनाई हुकूमाकरीता दाखल केला आहे. तसेच, वादींनी वाटणी, वेगळा ताबा व रक्कम परत मिळण्याकरीता पर्यायी मागणीसुध्दा केलेली आहे. वादींनी सदरच्या दाव्यात ज्या वाद जमीनी दर्शविलेल्या आहेत त्या संयुक्त कुटूंबाच्या जमीनी आहेत असे त्यांच्या वादपत्रात कथन केलेले आहे. तसेच, वादींनी त्यांचा व प्रतिवादींचा वाद जमीनीमध्ये १/३ हिस्सा असल्यामुळे वाटणीचा हुकूमनामा पारीत करण्यात यावा अशी पर्यायी मागणीसुध्दा केलेली आहे. वादींच्या दाव्यातील कथनावरून ही बाब दिसुन येते की, प्रतिवादी क्रं.६ याचा सुध्दा वाद जमीनीमध्ये १/३ हिस्सा आहे. त्यामुळे दाव्यातील वाद जमीनीमध्ये या तृतीय पक्षकारांचा हक्क व हितसंबंध गुंतलेला आहे ही बाब दिसुन येते. सदरच्या दाव्यामध्ये तृतीय पक्षकारांना प्रतिवादी क्रं.७ ते ९ म्हणुन समाविष्ट करण्याची परवाणगी दिल्यास वादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. कारण वादींना तृतीय पक्षकारांनी त्यांच्या लेखी जबाबात मांडलेल्या मुद्दयांवर उलटतपासणी घेण्याची संधी उपलब्ध राहील. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादींना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी दि.३०/०९/२०१९ रोजी तृतीय पक्षकारांना प्रतिवादी क्रं.७ ते ९ म्हणुन वादपत्रात समाविष्ट करावे.

अहमदपूर.
दिनांक : २४.०९.२०१९

(अ.रा.सुर्वे)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
अहमदपूर.

Certified that PDF copy of Order supra is word-to-word identical to the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | A.S.Kodgire |
| Dictated on | : | 24.09.2019 |
| Checked on | : | 24.09.2019 |
| Signed on | : | 24.09.2019 |
| Uploaded on | : | 24.09.2019 |